**<u>दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १५/२०१९ मधील निशाणी ५७</u>**

**<u>खालील आदेश</u>**

**<u>(CNR No. MHRT10-000390-2025)</u>**

दोन्ही बाजूंना ऐकले. अभिलेख पाहिले.

०२) अर्जात असे कथन आहे की, प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी जयराम कमळया चाफे यांचे कायदेशीर वारस आहेत असा ठराव करुन वारस दाखला मिळणेसाठी अर्ज दाखल केला केला आहे. प्रस्तुत कामी विनंती कलमामध्ये अर्जदार हे जयराम कमळया चाफे यांचे कायदेशीर वारस उत्तराधिकिारी आहेत असा, ठराव होवुन तसा वारस दाखला (Heirship certificate) मिळावे, अशी मागणी केली आहे.

०३) अर्जात पुढे असे कथन आहे की, अर्जदार व सामनेवाला क्र. ०८ ते १० हे जयराम कमळया चाफे यांचे कायदेशीर वारस उत्तरधिकारी आहेत, असा ठराव होवुन तसा वारस दाखला मिळावे अशी दुरुस्ती करणेस विनंती करण्यात आली आहे.

०४) प्रस्तुत अर्जावर विरुध्द पक्षांचे म्हणणे मागविले असता, सामनेवाला यांनी सदर अर्जावर तीव्र आक्षेप घेतला आहे, असे म्हणणे सादर करण्यात आले आहे.

०५) प्रस्तुतचा अर्ज हा वारस दाखल मिळणेकरीता दाखल करण्यात आला आहे. अर्जातील मागणी पाहता, दुरुस्ती मंजूर केल्यास दाव्याच्या स्वरुपात कोणताही बदल होणार नसून सामनेवालांचे कोणतेही नुकसान होणार नसल्याचे दिसून येते. सबब, न्यायाच्या दृष्टीकोनातून प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे न्यायोचीत वाटते. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे –

**<u>आदेश</u>**

१) अर्ज निशाणी क्रमांक ५७ हा विनाखर्च मंजूर करण्यात येतो.

२) अर्जदाराने अर्जात मागितलेली दुरुस्ती मुदतीत करुन दुरुस्तीप्रत अभिलेखावर मुदतीत दाखल करावी.

**(एस. एस. हाके)**

**दि. १०/०७/२०२६**  **दिवाणी न्यायाधीश क. स्तर राजापुर**

**स्थळः राजापुर**  **जि. रत्नागिरी.**